नांदेड जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग

dyceogadzpnanded@gmail.com दुरध्वनी : ०२४६१ - २३४६६८

जाक्र/जिपनां/साप्रवि/आस्था-२-ब/१५१/ २०२६ दिनांक:०५/०६/२०२६

प्रति,

१. मा.प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा.नांदेड
२. सर्व खाते प्रमुख,जिल्हा परिषद,नांदेड
३. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती,जिल्हा नांदेड
४. सर्व बाल विकास अधिकारी एकात्मीक बाल विकास सेवा योजना ,जिल्हा नांदेड.
५. सर्व गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जिल्हा नांदेड (मार्फत सर्व जि.प.हा.)
६. सर्व उप विभागीय अभियंता, उप विभाग (बांधकाम/लघुपाटबंधारे/पाणी पुरवठा) जिल्हा परिषद,नांदेड
७. सर्व तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,नांदेड
८. सर्व वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रं जिल्हा नांदेड (मार्फत ता.आ.अ)
९. सर्व मुख्याध्यापक ,जिल्हा परिषद हायस्कुल जिल्हा नांदेड (मार्फत गशिअ)

विषय :- जिल्हा सेवा वर्ग-३ सहायक प्रशासन अधिकारी / कनिष्ठ प्रशासन अधिकारी/ वरिष्ठ सहाय्यक /कनिष्ठ सहायक/ लघु लेखक - लघु टंकलेखक या संवर्गाची दि.०१/०१/२०२६ रोजीची अंतिम सेवा ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही २०१६/ प्र.क्र.२८१/ कार्या-१२ दिनांक १३ जुलै २०२१.

२. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२४/ प्र.क्र.५०९/ आस्था-७ दि. २९/११/२०२४

३. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र.सेवाजे-२००८/प्र.क्र.३९/ आस्था-१० दिनांक ३१ मार्च २०१७.

४.मा.मु.का.अ.यांचे अधिकार प्रदान आदेश जा.क्र.जिपना/साप्रवि/आस्था-१/७ दि.३/११/२००७

५. या कार्यालयाचे पत्र जा.क्रं.जिपनां/साप्रवि/आस्था-२ब/५४/२०२६ दिनांक ०५/०१/२०२६

६. मा.अवर सचिव, ग्रामविकास विभाग यांचे शासन पत्र क्र.संकिर्ण-३१२५/प्र.क्र.१३९/आस्था-८ दिनांक २१ मे २०२५

७. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नांदेड यांचेकडील जा.क्र./जिपना/साप्रवि/आस्था-२ब/ १००४/२०२६ दिनांक ३१/०३/२०२६

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र. ०१ च्या शासन परित्रकान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन), २०२१" ही दिनांक २१ जून २०२१ पासून अंमलात आली असल्याचे व सदर नियमावलीतील नियम ५ नुसार प्रत्येक सक्षम प्राधिकाऱ्याने, यापुढे त्याच्या नियंत्रणाखालील प्रत्येक संवर्गाची, प्रतिवर्षी दिनांक १ जानेवारी रोजीची त्या संवर्गात मागील वर्षी प्रत्यक्षात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची अंतिम ज्येष्ठतायादी तयार करून प्रसिध्द करणेबाबत निर्देश आहेत. तसेच संदर्भ क्र. ०२ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन), २०२१" जिल्हा

परिषद कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येत असल्याचे नमूद करुन या नियमातील तरतूदी विचारात घेवून कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत. संदर्भ क्र.०६ वरील दिनांक २१/०५/२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये दिनांक ३१/१०/२०२३ रोजीचे शासन पत्र रद्द करण्यात आले आहे. स्पर्धा परिक्षेतून उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठता दिनांकाबाबत संदर्भाधीन दिनांक १८/१२/१९८९ आणि दिनांक ०९/०९/२००७ च्या शासन निर्णयांमधील तरतुदींनुसार प्रचलित नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामुळे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नांदेड यांचेकडील दिनांक ३१/०३/२०२६ च्या आदेशान्वये दि. १४/०२/२०२४ रोजीचे आदेश रद्द करुन स्पर्धा परिक्षेतून उत्तीर्ण झालेल्या नांदेड जिल्हा परिषदेतील एकूण २१ कर्मचाऱ्यांच्या संदर्भाधीन शासन निर्णयांमधील तरतुदींनुसार प्रचलित नियमानुसार वरिष्ठ सहाय्यक पदावर रुजु झाल्याच्या दिनांकास त्यांची ज्येष्ठता निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार जिल्हा सेवा गट-क वर्ग-३ **सहायक प्रशासन अधिकारी / कनिष्ठ प्रशासन अधिकारी/ वरिष्ठ सहाय्यक /कनिष्ठ सहायक/ लघु लेखक - लघु टंकलेखक** या संवर्गाच्या तात्पुरती ज्येष्ठता याद्या या कार्यालयाचे दिनांक ०५/०१/२०२६ रोजीच्या संदर्भ क्र.०५ वरील पत्रान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. तसेच दिनांक ०१/०१/२०२६ रोजीच्या तात्पुरती सेवा ज्येष्ठता यादीवर आणि दिनांक ०१/०१/२०२५ रोजीच्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीवर संबंधित संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे आक्षेप व हरकती असल्यास सदर यादी प्रसिध्दीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करण्याबाबत आणि मुदतीनंतर आलेले आक्षेप व हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची गांभीर्याने नोंद घेण्याबाबत सुचित करण्यात आले होते.

सेवा ज्येष्ठता यादीवर प्राप्त झालेल्या आक्षेप व हरकतींचा विचार करुन संदर्भ क्र.०४ नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद नांदेड जिल्हा सेवा गट-क वर्ग-३ **सहायक प्रशासन अधिकारी / कनिष्ठ प्रशासन अधिकारी/ वरिष्ठ सहाय्यक /कनिष्ठ सहायक/ लघु लेखक - लघु टंकलेखक** या संवर्गाच्या दिनांक ०१/०१/२०२६ रोजीच्या सेवा ज्येष्ठता याद्या अंतिम करण्यात येऊन यापत्रकासोबत प्रसिध्द करण्यात येत आहेत.

तरी सदर सेवा ज्येष्ठता याद्या आपल्या अधिनस्त संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शणास आणुन त्यांची स्वाक्षरी घेवून पोहोच आपल्या दप्तरी ठेवणेत यावी.

सोबत : दि. ०१/०१/२०२६ च्या अंतिम सेवा ज्येष्ठता याद्या.

(राजकुमार मुक्कावार)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद नांदेड